## प्रेसनोट दि.२३/१२/२०१७

### अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

# " लोहिया नगर येथील आरती मिसाळ हिचे अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट पोलीसांकडून उध्वस्त''

दि. १५/१२/२०१७ रोजी आम्ही स्वतः व अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील स्टाफ सरकारी वाहनाने खडक पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे गैरव्यवहार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी पेट्रोलिंग फिरत असतांना १५.१५ वा. चे सुमारास एकबोटे कॉलनी येथील रेणुका माता मंदीर समोरील रोडवर सार्वजनीक ठिकाणी घोरपडे पेठ, पुणे येथे इसम नामे १) गोपीनाथ नवनाथ मिसाळ, वय -२२ वर्षे, रा. इनामके मळा, लोहियानगर, पुणे व २) हुसैन पापा शेख, वय – २८ वर्षे, रा. जाकु क्लब, सैय्यद अली चाळ, रुम नं. ११, सांताक्रुज (पुर्व), मुंबई हे दोन इसम संशयितरित्या थाबंलेले मिळुन आले.

त्यांचेकडे अंमली पदार्थ असल्याचा संशय आल्याने, एनडीपीएस कायदयातील तरतुदी प्रमाणे वरील दोघांची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात प्रत्येकी ४०० ब्राऊन शुगरच्या पुडया, असे एकूण ८०० पुडयामध्ये ६७ ग्रॅम ब्राऊन शुगर (हेरॉईन) कि.रु. २,०१,०००/- रु. १,०००/- चा एक मोबाईल व रोख रक्कम रु. १,२००/- असा एकुण २,०३,२००/- रुपयेचा मुद्देमाल मिळुन आला.

त्याचेकडे मिळुन आलेल्या ब्राऊन शुगर या अमंली पदार्थाबाबत तपास करता, मुबंई येथील आयेशा (आशाबाई) पापा शेख व तिची मुलगी जुलैखाबी पापा शेख हिने, हुसैन पापा शेख याचे मार्फत, पुणे येथील आरती महादेव मिसाळ हिला वरील ब्राऊन शुगरच्या पुड्या देणेसाठी मुंबईहुन पाठविल्याचे निष्पन्न झाले आहे. हुसैन पापा शेख हा आयेशा (आशाबाई) पापा शेख हिचा मुलगा आहे. आरती महादेव मिसाळ हिने तिचा चुलत भाऊ गोपीनाथ नवनाथ मिसाळ यास, हुसैन पापा शेख याचेकडून ब्राऊन शुगर (हेरॉईन) च्या पुडया ताब्यात घेण्यासाठी एकबोटे कॉलनी येथे पाठविले होते.

अधिक तपासात आरती महादेव मिसाळ, तिची बहिण पुजा महादेव मिसाळ, ५१२ भवानीपेठ येथे राहणारे निलोफर शेख व तिचा भाऊ अजहर (चुहा) शेख आणि रामटेकडी, पुणे येथे राहणारा रॉकी जालींदरसिंग कल्याणी तसेच आयेशा (आशाबाई) पापा शेख व तिची मुलगी जुलैखाबी पापा शेख यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाला आहे. त्या सर्वाचे विरुध्द खडक पोलीस स्टेशन गु. र. नं. ४९२/२०१७ एनडीपिएस ॲक्ट कलम ८(क),२१(ब),२९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन १) गोपीनाथ नवनाथ मिसाळ, २) हुसैन पापा शेख यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

वरील दोन्ही आरोपींना अटक केल्यानंतर, अझहर ऊर्फ चुहा हयात शेख, रा. ५१२, भवानी पेठ, पुणे यास सदर गुन्हयात अटक केल्यानंतर त्याचेकडून आणखी ८ ग्रॅम ब्राऊन शुगरच्या १०० पुडया व एक किलो ३० ग्रॅम चरस कि.रु.१,७४,०००/- चे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे लोहिया नगर येथील ब्राऊन शुगर व इतर अंमली पदार्थ विक्री करणारे आरती मिसाळ हिचे रॅकेट उध्दवस्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे व मा. मिलींद पाटील सहा.

पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व पोलीस कर्मचारी दिलीप जोशी, ज्ञानदेव घनवट, अविनाश शिंदे, मनोज साळुंखे, सौ. अरुणा राजगुरु, विठ्ठल खिलारे, अमित छडीदार यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री. सजंय गायकवाड खडक पो. स्टे. पुणे शहर हे करत आहेत.

प्रेसनोट दि.२३/१२/२०१७

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

**"निगडी पो. स्टे. चे हद्दीत गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या दोन इसमांकडून तीन लाख पधंरा हजार रुपयांचा गांजा जप्त"**

दि. २०/१२/२०१७ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील अधिकारी व पोलीस स्टाफ निगडी पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे गैरव्यवहार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी पेट्रोलिंग करत असतांना ०२.२० वा. चे सुमारास रात्री निगडी- भोसरी रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील पी.एम.टी. बस स्टॉप समोरील सार्वजनीक रोडवर पुणे येथे, इसम नामे १) महेश बबन जाधव, वय २१ वर्षे, रा. पी.एम.टी चौक, भोसरी, पुणे मुळ गाव-लोणीघाट, ता. व जिल्हा बीड २) दिपक रामदास धस, वय २८ वर्षे, रा. अजिंठानगर, पंचशिल हौसिंग सोसा., बिल्डींग नं. ८, रुम नं. १७ , निगडी, पुणे मुळ गाव- राज पिंपरी, ता. गेवराई, जिल्हा- बीड हे दोन इसम त्यांचेकडील हुडाई अॅसेन्ट कार क्र. एम. एच २३ ए. यु. ०१३३ मध्ये संशयितरित्या थाबंलेले मिळुन आले.

त्यांचेकडे अंमली पदार्थ असल्याचा संशय आल्याने, एनडीपीएस कायदयातील तरतुदी प्रमाणे त्यांची व त्यांचे कारची झडती घेतली असता त्यांचे कारमध्ये एकुण मिळुन २१ किलो ६९४ ग्रॅम कि.रु. ३,१५,०००/- चा गांजा मिळुन आल्याने त्याचे विरुद्ध निगडी पोलीस स्टेशन गु. र. नं. ७१६/२०१७ एनडीपिएस अॅक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे व मा. मिलींद पाटील सहा. पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, पोलीस निरीक्षक स्वाती थोरात व पोलीस कर्मचारी मोहन साळवी, मनोज साळुखे, सौ. अरुणा राजगुरु, रोहन चवरकर, विठ्ठल खिलारे, सचीन चंदंन, स्नेहल जाधव यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास स.पो. निरी. श्री. चव्हाण निगडी पो. स्टे. पुणे शहर हे करत आहेत.